# प्रभुतरुण

| वर्ष ४७ | अंक १ | मुंबई | जुलै २०१३ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## ‘तार’ छेडिता...

**—सुहासिनी कीर्तिकर**

फार पूर्वी माझ्या वाचनात एक गोष्ट (की कथा?) आली होती. फार परिणामकारक वाटली होती. भारताच्या सीमेवर प्राण तळहाती घेऊन लढणाऱ्या आर्मी ऑफिसरसंदर्भात होती ती. पण अस्सल संदर्भ होता मानवी मनाचा. सुसंस्कृतपणाचा कितीही आव आणला तरी अनेकवेळा स्वार्थांध मन असंस्कृतपणेच कसं वागतं; ते त्यात ठळकपणे आलं होतं. मला वाटतं; कथेचं नाव होतं- ‘परदु:ख शीतल’. लढाई चालू असते. केव्हा काय होईल; नेम नाही. अशावेळी रणभूमीवरून ख्यालीखुशाली घरी कळवत नाहीतच. मग आर्मी ऑफिसर्स क्वार्टर्समध्ये मागे उरलेल्या कुटुंबीयांची घालमेल. अशाच कुटुंबातली एरवी धीराची वाटणारी कथानायिका आपल्या नवऱ्यासंबंधी काही खबरबात कळेल का; या विवंचनेत अगदी व्याकूळ झालेली असते. टी.व्ही.वर लढाईच्या बातम्या झळकत असतात. मध्येच त्या थांबवून पंतप्रधानही धीरोदात्त भाषण करताना तेथे दिसतात. पण प्रत्यक्ष रणभूमीवर लढणाऱ्या क्ष, य, ज्ञचे काय? ते गुप्त! अशातच ती व्हरांड्यात अस्वस्थपणे येरझारा घालत असताना दूरच्या वाटेवरून बातमी घेऊन येणारा तारवाला दिसतो. लढवय्यांच्या घरी तारवाला? तिचा ठोकाच चुकतो हृदयाचा. कारण तार येणार ती खुशालीची नव्हेच. त्या क्वार्टर्समधल्या एखाद्या अधिकाऱ्याच्या प्राणाहुतीचीच असणार. तो वाटेवरून हळुहळू पुढे सरकत असतो. हिचे प्राण कंठाशी. आला... आऽऽला... आपल्या कंपाउंडशी आला. अरे देवा! काय वाढून ठेवलंय नशिबात?... तिची कासावीशी. आऽऽला... फाटकासमोर आला. डोक्यात घण बसू लागतात. अन्... पुढच्या क्षणाला तो तारवाला त्या घराचे फाटक ओलांडून शेजारच्या बंगल्याकडे वळतो. अन्... इथे ही हुश्श करीत मनोमन देवाचे आभार मानते. चऽऽला. मरण पुढच्या बंगल्यात पोहोचले. मग तिचं तिलाच स्वत:च्या मनाचं लाजिरवाणं रूप जाणवतं की अरेच्चा! तारवाला आला न् तो शेजारी गेला म्हणून आपल्याला आनंद व्हावा? बातमी मरणाची. पण ‘माझ्या घरी’ नाही. या मनाच्या असंस्कृतपणाची मग तिला लाज वाटत रहाते... अशी काहीशी तिची मनोवस्था, असंस्कृतपण दाखविणारी ती कथा होती. सुसंस्कृतपणा जरा खरवडला की असं काहीतरी दिसतंच. ते अनुभव होऊन त्या कथेत उतरलं होतं.

मित्रहो, आज ही कथा माझ्या मनाच्या तळातून अगदी अलगद वर आली. का बरं? हां! मन थोडं चाचपून बघितलं तेव्हा लक्षात आलं की या कथेत तारवाला आहे. तारेतल्या बातमीभोवती तिच्या मनाची स्पंदनं फिरताहेत. आता ही स्पंदनं एखाद्या कथाकाराला उद्या दाखवावीशी वाटली तर? छे! ती तारवाल्याच्या हलकेहलके घराजवळ येण्यातून, पुढे निघून जाण्यातून नाही दाखवता येणार. कारण?

कारण आता इथून पुढे तारवाला भलीबुरी बातमी घेऊन, अभिनंदन-शुभेच्छा घेऊन कुणाच्याच दारी येणार नाही. ‘भाभीको साथ लेना।’ ऐवजी अक्षरमांडणीत घोटाळा होऊन ‘भाभी को साथ ना ले।’ असे तारेतील विनोदही घडणार नाहीत. शारदा या नावातील किंवा शकीला या नावातील शेवटचे अक्षर-‘ए ’ गाळल्यामुळे संदेश ‘शरद डिलीव्हर्ड’, ‘शकील डिलीव्हर्ड अ बेबीगर्ल’ असा होऊन विनोदी तार आता येणार नाही. ‘लगेच निघा’ (‘स्टार्ट इमिजिएटली’) असा संदेश देणारी तार मिळेमिळेपर्यंत निघणारा निघूनही गेलेला असतो; असेही किस्से आता असणार नाहीत. अहो! मोर्सने सुरू केलेले हे ‘मोर्सकोड’च आता अधिकृतरित्या बंद झाले

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## झपाटलो रे...

**-संजना दीपक कोठारे**

कोणताही नवीन चित्रपट प्रदर्शित होत असला की एक महिना आधीपासून आमच्या घरी त्याची चर्चा सुरू होते. चित्रपटाच्या गोष्टी म्हटल्या की माझे कान नकळतच बंद होतात आणि ते शब्द बंद कानावर जणू आदळत असतात. तरी एखादा चित्रपट चांगला असेल असे वाटले तर मी स्वतः तो पाहण्यासाठी आतुर असते. कधी आपल्याला एखाद्या नायक किंवा नायिकेसाठी तो चित्रपट पहावासा वाटतो; तर कधी एखाद्या दिग्दर्शकासाठी तर; कधी एखाद्या मोठ्या निर्मितीगृहाच्या नावामुळे आणि जेव्हा ह्या सगळ्याच गोष्टी एकत्र येतात तेव्हा उत्साह द्विगुणीत होतो.

‘तात्या विंचू’ परत येतोय! ही घोषणा गेले काही वर्ष ऐकल्यापासूनच मराठी चित्रपट पाहणाऱ्या श्रोत्यांच्या मनात एक उत्सुकता आणि खळबळ चालू झालेली. काही चित्रपट असतात ज्यातली पात्रे लोकप्रिय होतात आणि त्या पात्रांची नावे अजरामर होतात. गब्बरसिंग म्हणा किंवा विजय दिनानाथ चौहान, मोगाम्बो असो किंवा शाकाल. लहानपणापासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकाला ह्या पात्रांची ओळख आहे. तसेच आपले ‘तात्या विंचू’, आणि ‘कुबड्या खवीस’. जर ‘गब्बर सिंग’चा खौफ हिंदी सिनेसृष्टीत आहे तर मराठी सिनेसृष्टीत ‘तात्या विंचू’चे राज आहे. अशी पात्रं निर्माण करून लोकांपर्यंत पोहोचवणं सोप्पी गोष्ट नाही आणि जरी ती लोकांपर्यंत पोहोचली तरी त्या पात्रांना एक जीवंत रूप देऊन श्रोत्यांच्या आयुष्याचा भाग बनवणं अजुनही कठीण. पात्रांना जीवंत स्वरूप आणून आपल्या आयुष्याचा भाग बनवणे दिग्दर्शकाचे काम आहे आणि ते यशस्वीपणे साधलंय आपल्याच महेश कोठारे यांनी.

सतत काहीतरी नवीन करण्याचे धाडस महेश कोठारे करत असतात आणि त्यांच्या प्रत्येक चित्रपटात एक तांत्रिक प्रगती दिसून येते. मराठी सिनेसृष्टीला महेश कोठारे यांचे बरेच मोठे योगदान आहे आणि १९८५ पासून त्यांनी जी चळवळ चालू केली आहे, त्या चळवळीने संपूर्ण महाराष्ट्र आता झपाटून गेला आहे. मराठी सिनेसृष्टीला पहिला ३डी चित्रपट देणारे आपले महेश कोठारे आहेत, हे सांगताना अतिशय अभिमान वाटतो. ‘झपाटलेला २’हा उत्तम दर्जाचा उत्कृष्ट सिनेमा असून केवळ दोन आठवड्यात ५ कोटी रुपयांच्यावर धंदा केला आहे. महेश कोठारे यांच्या नावावर आणखी एक विक्रम नोंदला गेलाय आणि तो म्हणजे ‘झपाटलेला २’ हा तिसऱ्या आठवड्यातसुद्धा २४० स्क्रिन्सवर प्रदर्शित केला गेला.

‘धूमधडाका’पासूनचे त्यांचे सर्व चित्रपट यशस्वी झालेच होते. दे दणादण, थरथराट, झपाटलेला, खतरनाक, पछाडलेला, खबरदारसारखे असे अनेक चित्रपट आपल्याला देऊन महेश कोठारे यांनी आपला एक वेगळाच ठसा उमटवला आहे. एक आघाडीचा चळवळीचा दिग्दर्शक म्हणून त्यांचे नाव मराठी सिनेसृष्टीतच नव्हे तर; हिंदी सिनेसृष्टीतही आदराने घेतले जाते. महेश कोठारे यांनी मराठी सिनेसृष्टीला पहिला सिनेमास्कोप चित्रपट ‘धडाकेबाज’ ह्याची निर्मिती आणि दिग्दर्शन करून दिला. ‘चिमणी पाखरे’ चित्रपटातून त्यांनी प्रथमच मराठी सिनेमात डॉल्बी डिजीटल ध्वनिमुद्रण आणले. संगणकाचा उपयोग करून एका वेगळ्या पद्धतीने चित्रीकरण करून महेश कोठारे यांनी ‘पछाडलेला’ ह्या चित्रपटाला एक उच्च तांत्रिक दर्जा दिला जो मराठी सिनेसृष्टीत पहिल्यांदाच पाहिला गेला आणि आता ‘झपाटलेला २’ मध्ये उच्च दर्जाचे ३डी तंत्रज्ञान आणि संगणक ग्राफिक्सचा उत्तम उपयोग

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)

आहे. आम्हाला 'एनसीसीमध्ये 'कोडसंदेशन' हा परीक्षेचा स्वतंत्र भाग असायचा. त्याची भाषा मात्र 'डा डिड् डा डा डिड्' अशी असायची. सैनिकांची सांकेतिक लिपी. (त्यात मी मुंबईतून पहिली आले होते.) मोर्सची लिपी 'कड कट्ट कड कट्ट' अशी यांत्रिक कुशलतेची होती. बातमी, संदेश, शुभेच्छा सर्व 'कडकट्ट'ने काही मिनिटात थेट इच्छित स्थळी पोहोचायचे. निरोपाच्या दळण-वळणाची केव्हढी मोठ्ठी जलद सोय!

पण यांत्रिक कुशलतेत आपण माणसं त्याहीपेक्षा जलद वेगानं पुढेपुढेच चाललो आहोत ना? एकेकाळी कुणाघरी बातम्या देणारा रेडियो असला, 'ट्रिंगट्रिंग' वाजणारा टेलिफोन असला तर कोण कौतुक वाटायचं! मला आठवतंय्, माझ्या माहेरी जेव्हा फोन आला तेव्हा तो आधी सगळ्या नातेवाईकांना लावून झाला. त्यातून बोलायचं म्हणजे फक्त कामासाठीच; असंही समीकरण असायचं. मग कधी खाली रहाणाऱ्यांसाठी बाहेरगावाहून त्यांच्या नातेवाईकांचा फोन आला की त्यांना धावत धावत बोलवायला जावं लागायचं. कारण घरोघरी टेलिफोन नावाचं देवक बसवलेलं नसायचं ना! आता अनेक घरातील हे देवक उठलंय्... लँडलाइन टेलिफोन घरातून काढून टाकले जाताहेत. कुटुंब वा घरकेंद्री संवाद आता व्यक्तीकेंद्री होत 'मोबाईल' झालाय्. परत त्या संवादासाठी बोलावं लागतेच असंही नाही. तारेतून जशी कमीतकमी अक्षरात मांडणी व्हायची; (शब्दाप्रमाणे दर वाढायचे म्हणून!) ; तशी 'एसेमेस'मधून आता केली जाते. 'यू' म्हणजे 'वायओयू' नाही बरं का. नुसतंच 'यू' लिहिलं की भागलं. म्हणजे पोस्टात जा; तारेचा फॉर्म घ्या; शब्द मोजणी करत त्यावर संदेश लिहा किंवा अभिनंदन वगैरेचे आकडे टाका, पैसे भरा, पावती घ्या... असली 'एसेमेस'च्या तुलनेत वेळकाढू भानगडच नाही. थेट संपर्क मोबाईलवर किंवा थेट संवाद डोळ्यांशी एसेमेसवर. मग तारेची तारेवरची कसरत कशाला कोण करणार? शहरातून जशी चाळसंस्कृती लोप पावली, गॅलऱ्यातून तारांवर घातलेली 'चिरगुटे' नाहीशी झाली तशी पोस्टखात्यातून हे 'तारे'ला लोंबकळून चालणारे संभाषणही हळुहळू अटळपणे अस्ताला गेले.

'तारवाला' हा परोपकारी प्राणीही अर्थातच नामशेष झाल्यागतच होता. तरी बरं! कंपन्यांचे अहवाल, नोटिसा, विविध प्रकाशनांची पुस्तकं तरी अजून पोस्टानं येतात. नाहीतर तारवाल्याचा हा 'खाकी' भाऊ-पोस्टमनही अस्ताला गेला असता. पोस्टमन अजूनही आपला दोस्त वाटतो, काहींच्या कुटुंबातीलच एक वाटतो. मला आठवतंय्, मीनाक्षी (आताची कार्यकारी संपादक) शाळकरी असताना तिला मी 'किशोर' लावला होता. त्या विशिष्ट तारखांना ती पोस्टमनची अगदी वाट पहायची. तो दिसला की विचारायची, 'किशोर आला?' ते पोस्टमनच्या इतकं अंगवळणी पडलं होतं की तो कुटुंबातीलच एक असल्यासारखा 'किशोर' आला की तिला हाकारून तो अंक स्वत:कडची भेट असल्यासारखा तिला द्यायचा. असे पोस्टमन आहेत; अजूनही आहेत. पण बिचारे तारवाले! 'तार'च जर संपली तर ती घरोघरी इमानेइतबारे पोहोचविण्याची 'तारेवरची'कसरत तरी ते कसे करणार?

आता त्यांना दुसरीकडे, कुठेतरी सामावून घेतले जाईल. तारघराच्या कर्मचाऱ्यांनाही आता कामाचे नवीन 'घर' मिळेल. तारेला श्रद्धांजली वाहायची तर 'कड्कट्ट कड्कट्ट'ला 'कट'च केले पाहिजे. कालाय तस्मै नम:! दुसरं काय?

हे तारबाई, तुझी जागा इतरांनी घेऊन तू जशी काळाच्या उदरात गडप झालीस तशी तुझी अनेक भावंडे तुझ्या मागोमाग जाऊन आमची यांत्रिक भरभराट होवो! मात्र माणूसपणाची तार सदैव जुळती राहो!!

*

## अभिनंदन

❁ श्री. राहुल चिंतामणी वेलकर यांची आत्माराम बुवा मंदिराचे विश्वस्त म्हणून नियुक्ती झाली.

❁ महाराष्ट्र राज्य भाषा संचालनालयातर्फे 'पुढील पंचवीस वर्षातील मराठी' या विषयावर महाराष्ट्रभर विचारसंवाद सुरू आहे. मुंबईतील या विचारसंवादाचे अध्यक्ष होते डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, समन्वयक होते श्री. सतीश काळसेकर. या सभेस कार्यकारी संपादिका असलेल्या सौ. मीनाक्षी जयकर निमंत्रित म्हणून उपस्थित होत्या. या सभेस निमंत्रित म्हणून उपस्थित असलेल्या प्रा. सुहासिनी कीर्तिकरांनी प्रास्ताविकही केले.

❁ कुसुमाग्रजांच्या नावे नवोदित कवीला 'विशाखा पुरस्कार' दिला जातो. या पुरस्काराच्या निवड समितीत प्रा. सुहासिनी कीर्तिकरांचा समावेश होता. नाशिक येथील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातर्फे हा उपक्रम असतो.

❁ विजय तेंडुलकरांचे 'मधल्या भिंती' हे नाटक 'आविष्कार' संस्थेतर्फे नव्याने सादर होत आहे. त्यात कलासहाय्यक म्हणून श्री. स्वप्नील जयकर यांचे योगदान आहे.

❁ विजय तेंडुलकरांचे 'गिधाडे' हे नाटक 'कल्पिता निर्मिती'ने पुनरुज्जीवित केले आहे. कल्पिता तळपदे यांची ही प्रयोगशील निर्मिती आहे. अभिनंदन.

(पान १ कॉलम ४ वरून)

केलेला दिसतो.

मित्रांनो, आता 'महेश कोठारे' म्हणून महेश कोठारेंचे संबोधन इथेच संपवते बरं का! इतका वेळ मी केवळ एक उत्कृष्ट निर्माता आणि दिग्दर्शक 'महेश कोठारे' बद्दल बोलत होते, त्यांच्याबद्दल असंख्य टी.व्ही. वाहिन्या आणि अनेक मासिके, वृत्तपत्रातूनही खूप म्हटले गेले आहे. आपणा सर्वांना त्यांची ख्याती माहीत आहे आणि मी काही नवीन सांगत नाही. परंतु सांगितल्याशिवाय राहवतसुद्धा नाही. इतर त्यांना महेशजी, कोठारेसाब, किंवा महेशसर म्हणून संबोधत असतील आणि त्यांच्याबद्दल खूप काही लिहिलेसुद्धा असेल, परंतु यापुढे मी तसे करणार नाही. कारण एवढेच की ते आपल्या परिवाराचा हिस्सा आहेत आणि आपल्या माणसांना आपण घरच्या माणसासारखेच संबोधले पाहिजे, नाही का? मी त्यांच्यापुढे बरीच लहान असल्यामुळे या पुढचा उल्लेख महेशमामा म्हणूनच करावासा वाटतो.

७ जून, २०१३ला 'झपाटलेला २' प्रदर्शित झाला आणि दुसऱ्या दिवसापासूनच 'फेसबुक'वर महेशमामांनी मराठी श्रोत्यांना झपाटून टाकल्याची बातमी कळली. मी चित्रपटप्रेमी नसूनही महेशमामांचा चित्रपट पाहणे माझ्यासाठी अत्यंत गरजेचे होते. मुलांना घेऊन दुपारच्या शोला गेले. या चित्रपटातून अपेक्षा भरपूर होत्या; परंतु चित्रपटाच्या सुरुवातीपासून एक समीक्षक म्हणून त्या चित्रपटाकडे पाहात होते. कोठारे परिवाराच्या प्रत्येक सिनेमाला मी कायम एका समीक्षिकेच्या नजरेतून पाहिले आहे आणि त्यातले गुणदोष कळविले आहेत. त्यामुळे चित्रपट सुरू होताच माझ्यातला टीकाकार जागा झाला. परंतु पहिल्या प्रवेशानेच आपला ठसा उमटविला. 'कुबड्या खवीस'चा त्या संग्रहालयातला ३डी प्रवेश उत्कृष्ट होता. त्यापुढे अपेक्षा वाढत गेली आणि ती महेशमामांनी पूर्णपणे सार्थ केली. कसलीच उणीव जाणवली नाही आणि चित्रपटगृहात आलेल्यांची सकारात्मक प्रतिक्रिया ऐकून त्यांचा अधिकच अभिमान वाटू लागला. मुलांनासुद्धा चित्रपट इतका आवडला की घरी आल्याबरोबर बाबांनासुद्धा 'पाहिलाच पाहिजे म्हणून रात्रीच्या शोला जाऊ' असा आग्रह चालू होता. हीच खासियत असते महेशमामांच्या चित्रपटांची की ते सर्व वयोगट मजेत पाहू शकतात आणि कितीही वेळा पाहिले तरी तेव्हाच आनंद लुटू शकतात.

या चित्रपटात अजून एक महत्त्वाची गोष्ट होती जी मला पाहण्याची उत्सुकता होती आणि ती म्हणजे आदिनाथ कोठारेची भूमिका आणि त्याचे काम. आदिचे प्रत्येक काम मी पाहिले आहे आणि त्याच्या अभिनयाचा स्वाभाविक कलसुद्धा पाहिला आहे. परंतु प्रत्येक नवीन नायकाला आपले स्थान कायम राखायला अनेक परीक्षा द्याव्या लागतातच. आदिचा प्रवास बरीच वर्षे चालू आहे आणि त्याच्या प्रगतीचा ठसा तो त्याच्या प्रत्येक भूमिकेतून उमटवत आला आहे. त्याची हीच प्रगती प्रत्यक्षात पाहायची होती; आणि अभिमानाने सांगते की, आदिनाथ कोठारे यांनी 'झपाटलेला २' मध्येही आपला स्वतंत्र ठसा उमटविला आहे आणि एक 'चॉकलेट बॉय' म्हणून प्रत्येक तरुणीच्या मनात घर करून गेला आहे. तरुण मुलीच कशाला, लहान मुलामुलींकडूनही आदिनाथ कोठारेचं नाव ऐकून बरे वाटते. अतिशय देखणा, त्याचबरोबरीने सोज्वळ असे व्यक्तिमत्त्व असलेला आदि या सिनेसृष्टीत स्वत:चे अस्तित्व कायम करेल याची खात्री आहे. 'ऑल द बेस्ट'सारख्या यशस्वी नाटकाचे अनेक प्रयोग करून आदिने कॉमेडीचं टायमिंग बऱ्यापैकी साधले आहे. चित्रपटाच्या शेवटी आदि आणि तात्या विंचूची लढाई अतिशय सुंदररीत्या चित्रित केली आहे आणि त्यात आदिचे विशेष कौतुक करावेसे वाटते. आपल्या मराठी सिनेसृष्टीला ज्या नायकाची उणीव भासत होती ती आता आदि पूर्ण करेल यात शंका नाही.

टी.व्ही.वरच्या एका मुलाखतीत महेशमामा आणि आदिला मराठी सिनेसृष्टीतील अमिताभ-अभिषेक म्हटले गेले. परंतु मी या मताशी सहमत नाही. महेशमामा एक अप्रतिम दिग्दर्शक आहे. त्याला उत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून फिल्मफेअर, स्क्रिन आणि महाराष्ट्र राज्याचे विविध पुरस्कार मिळाले आहेत. २००९ साली मराठी सिनेसृष्टीला लक्षणीय योगदान केल्याबद्दल महाराष्ट्र राज्याने महेश कोठारेंचा गौरव केला. त्यामुळे एक उत्कृष्ट निर्माता-दिग्दर्शक म्हणून त्यांचे नाव घेणे योग्य ठरेल आणि राजकपूर, मनमोहन देसाई, हृषिकेश मुखर्जी यांच्यासारख्या दिग्गज दिग्दर्शकांच्या नावाबरोबर त्यांचे नाव घ्यायला काहीच हरकत नाही. महेशमामांनी मराठी चित्रपटात आणखी एक लक्षणीय वेगळेपणा केला आहे. त्यांनी त्यांच्याच चित्रपटाचा दुसरा भाग बनवला आणि त्याचबरोबरीने 'तात्या विंचू'ला जीवंत ठेवून श्रोत्यांची उत्सुकता आणि अपेक्षा आणखी वाढविली आहे. चित्रपटगृहातून बाहेर येताना प्रत्येकजणाने 'झपाटलेला ३'ची वाट बघण्याची अपेक्षा व्यक्त केली. ज्यारीतीने 'झपाटलेला २'ने सर्वांना झपाटून टाकले आहे त्याच झपाट्याने महेश आणि आदिनाथ कोठारेंच्या प्रत्येक चित्रपटाला अशीच लोकप्रियता मिळावी, अधिकाधिक पुरस्कार मिळावेत आणि जनतेच्या प्रेमाचा वर्षाव होत रहावा हीच सदीच्छा.

लेखांक-७

## फुलता नलिनी दल

# 'ना धरी लोभ मनी'

— नलिनी तळपदे

काही दिवसांपूर्वी वर्तमानपत्रात एक बातमी वाचली. बातमी वाचून विसरण्यासारखी नसून विचार करायला लावणारी होती. तशा अपघाताच्या, खून, बलात्कार, दरोड्याच्या बातम्या रोज येतच असतात. त्या प्रत्यही घडणाऱ्या घटनांनी आपलं मनही कोरडवाहू जमिनीसारखं रूक्ष झालं आहे, संवेदनाशून्य झालं आहे. आपण या बातम्या सहज नजरेखालून घालतो आणि तितक्याच सहजतेनं मनावेगळ्याही करतो.

पण ही बातमी वेगळी होती. तशी पैशाच्या बाबतीत फसवणूक कितीजणांची होते. पण पुढच्यास ठेच लागूनही मागचा शहाणा होत नसल्यामुळे ही मूर्ख वारकऱ्यांची दिंडी पैसेरूपी परमेश्वराची पालखी घेऊन मुक्कामाला पोहोचण्याऐवजी आपणच खोदलेल्या खड्ड्यात पडते. पस्तावते. या मुर्खांच्या मेळाव्यात शिक्षित, अशिक्षित असा भेदभाव नसतोच मुळी. सारे एका माळेचे मणी. पैशाच्या पाठी धावणारे. पण ही धाव ऊर फुटेस्तोवर करायची की ठराविक मर्यादेपर्यंत करायची हे ज्याचं त्यानं ठरवायचं. हे ज्यांना कळत नाही ते गोत्यात येऊन शेवटी जातात बुडीत खात्यात.

अशाच एका उच्चविद्याविभूषित महिलेची झालेली फसवणूक ठळक मथळ्यासह वर्तमानपत्रात छापली होती. मुळात वैद्यकीय व्यवसायात जम बसलेली ही डॉ. महिला या मोहाला बळी पडली याचंच आश्चर्य वाटतं. बातमी वाचताक्षणी मनात विचार आला-

आधी गेली बुद्धी, गेले मग भांडवल
शिक्षण ते फोल, तिचं ज्ञान मातीमोल।
खोदला गं तिच्या हाती तिने खड्डा
खोल
लावावा का तिने आता नशिबाला
बोल।।

अहो, माणसानं मोहाच्या आधीन किती व्हावं आणि लोभाला बळी किती पडावं? आपली लाखमोलाची कष्टाची कमाई सहजगत्या दुसऱ्याच्या ओंजळीत टाकतांना तिची सारासार विचारशक्ती जणू पडदानशीन झाली होती. अशा कुठल्या ना कुठल्या गोष्टीची हाव धरणाऱ्या, लोभी प्रवृत्तीची, कमकुवत मनाच्या माणसांमुळेच या संमोहनशास्त्राची एवढी चलती चालली आहे..

एकदा दुनिया झुकती है कळलं की झुकानेवाल्यांना काय तोटा? आमच्या कंपनीत पैसे गुंतवा आणि दामदुपटीने वसूल करा अशी आमिषं दाखवून किती कंपन्या येतात आणि लोकांच्या लोभीपणाचा, मूर्खपणाचा फायदा घेऊन परागंदा होतात. काहींना पोलिसी हिसका बसतोही. आता प्रश्न येतो तो अशा फसव्या जाहिरातींचा खड्डा समोर दिसत असताना कुठलीही शहानिशा न करता त्यात बेधडक उडी मारणाऱ्या उतावीळ माणसांचा. मान्य; पैसा म्हणजे वित्त, हा विषयच मुळी चित्त विचलित करणारा आहे. त्याच्या भूलभुलैयानी आपल्या जाळ्यात भल्याभल्यांना गुंतवून नामोहरम केलं आहे.

एकवेळ भविष्याची चिंता न करता वर्तमानकाळातील येईल त्या क्षणाचा मनसोक्त उपभाग घेऊ पाहणाऱ्या काही खुषमिजास तरुणांची मानसिकता आपण समजू शकतो. पण ज्यांनी अनेक उन्हाळे पावसाळे पाहिले आहेत, कष्टाने आयुष्यभराची कमाई केली आहे असे बुजुर्गही या मोहाला बळी पडून आपली आयुष्यभराची पुंजी घालवून बसतात ह्याचंच वाईट वाटतं. कळत नाही त्यांची कीव करून सहानुभूती दाखवावी की जखमेवर मीठ चोळलं जाणार नाही अशा बेतानं त्यांची कानउघडणी करावी.

तसं पाहिलं तर लोभ हा माणसाचा स्थायीभाव आहे. जगात निर्लोभी माणूस असूच शकत नाही. कुणाकडे तो थोड्या प्रमाणात, कुणाकडे प्रकर्षानं आढळतो एवढंच. खरं तर आपणही कुणाच्या लोभाला पात्र व्हावं असं प्रत्येकाला वाटत असतं. आता पत्रलेखनाची प्रथा फोन, मोबाईलमुळे जवळजवळ कालातीत होण्याच्या मार्गावर आहे. पण जेव्हा पत्र लिहिली जात तेव्हा पत्राच्या शेवटी सही करण्यापूर्वी 'कळावे, लोभ असावा ही विनंती' असं आवर्जून लिहिण्याची प्रथा होती. अर्थात या लोभानं कुणाचं नुकसान न होता, विनंती मान्य झाल्यास तो लाभदायकच ठरत होता. उदाहरणार्थ, संपादकाने लेखकाचे 'साभार परत' न केलेले साहित्य.

प्रख्यात रशियन लेखक टॉलस्टॉय ह्यांच्या म्हणण्याप्रमाणे माणसाला फक्त साडेतीन हात इतक्या जमिनीची जरुरी आहे. जास्तीतजास्त जमीन मिळावी म्हणून सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत ऊर फुटेस्तोवर धावून मुक्कामाला पोहोचताचक्षणी एका माणसाच्या झालेल्या हृदयद्रावक शेवटाची ही गोष्ट आहे. गोष्ट कुरूप तितकीच उद्बोधक आहे. लेखकाने 'अति तिथे माती' हा संदेश देऊन माणसाच्या लोभी प्रवृत्तीवर मार्मिक भाष्य केलं आहे.

उलट, 'पोटापुरता पसा पाहिजे नको पिकाया पोळी
देणाऱ्याचे हात हजारो दुबळी माझी झोळी
महालगाड्या नकोत नाथा माथ्यावर दे छाया
गरजेपुरती देई वसने जतन कराया काया
एकवेळच्या भुकेस पुरते तळहाताची थाळी'

'प्रपंच'या सिनेमात अन्न, वस्त्र, निवाऱ्याच्या शोधात वणवण भटकणाऱ्या, ज्याचं आयुष्यच निरर्थक आहे अशा माणसाच्या मुखातून 'गदिमां'चं हे अर्थपूर्ण गीत ऐकताना मनात विचार येतो- जगात इतकं समंजस, समाधानी अल्पसंतुष्ट कुणी असतं का? की ज्यांना या सगळ्यापासून वंचित रहावं लागतं त्यानाच असलं शहाणपण सुचतं. होय, फक्त त्यांना आणि त्यांनाच हे शहाणपण सुचतं की ज्यांच्याजवळ मुळातच काही नसतं. कोणत्याही गोष्टीचा साठा, संचय करणं ही माणसाची सहजप्रवृत्ती आहे. भविष्याची तरतूद म्हणून हे ठीक आहे. परंतु त्याचा इतकाही लोभ धरू नये की केवळ आपल्या गरजा भागविण्यासाठी सुनेच्या माहेरहून अधिकाधिक पैशाची मागणी करून ती पूर्ण न झाल्यास तिचा मानसिक आणि शारीरिक छळ केला जावा.

'खरा तो प्रेमा, ना धरी लोभ मनी' असं म्हणतात. पण कित्येक प्रेमिकांच्या मनावर लोभानं अधिराज्य गाजवून प्रेमाला शरणागती घ्यायला लावली आहे.

पूर्वीचे राजेमहाराजे प्रजेचं पुत्रवत पालन करीत. प्रजेकडून कसलीही अपेक्षा न करता त्यांच्या हितासाठी, कल्याणासाठी झटणं हाच आपला राजधर्म आहे असं ते मानत. त्यामुळे प्रजेच्या मनातही त्यांच्याबद्दल आदराची भावना असे.

आता ती राज्ये गेली. संस्थानं खालसा झाली. आणि लोकशाहीच्या नावाखाली शासनकर्त्यांची मनमानी सुरू झाली. कुणीही यावं आणि जनतेच्या तोंडचा घास काढून आपल्या पोळीवर तूप ओढावं. भ्रष्ट, लोभी राज्यकर्त्यांच्या राजकारणात बिचाऱ्या जनतेच्या हिताचा, कल्याणाचा बळी गेला. राज्यकर्त्यांना जनतेविषयी वाटणारं प्रेम, आपुलकी, कळकळ या भावना तर पार तडीपार केल्या गेल्या. लोभाचा वेलू मात्र अगदी गगनावरी गेला आहे.

नुकताच केदारनाथ यात्रेच्यावेळी उत्तराखंडात झालेला महाप्रलय म्हणजे लोभाच्या कडेलोटाचा जिताजागता पुरावा आहे. पर्यावरण-तज्ज्ञांनी दिलेले इशारे डावलून संपत्तीच्या लोभाने केलेली निसर्गाची अपरिमित हानीच या विनाशाला कारणीभूत झाली. पण ते कळायला सत्तेचा माज आणि मत्तेचा लोभ असलेल्या सरकारचं डोकं ठिकाणावर असायला हवं ना?

*

### अभिनंदन

❁ भारताचा प्रतिनिधी म्हणून श्री. उन्मेष प्रकाश नायक २ जून रोजी दक्षिण आफ्रिका, दरबान येथील मॅरेथॉनमध्ये सहभागी झाले. सहभाग पूर्ण केल्याबद्दल त्यांना गौरवपर पदक देण्यात आले. या आधीही त्यांचा सिंगापूर, जर्मनी येथे सहभाग होताच. अभिनंदन.

*

**हसरी रेखा** -प्रदीप कोठारे



# युवामंच

( सौ. लता आणि श्री. कुमार त्रिलोकेकर यांची नात निकोल पाल हिचा लेख ‘वॉशिंग्टन पोस्ट’मध्ये प्रसिद्ध झाला. ‘प्रभुतरुण’च्या वाचकांकरिता तो येथे देत आहोत.

-संपादक)

## How One Father helped educate his Engineering Daughter

(Here’s a sweet Fathers Day piece by Santa Clara University student Nicole Pal about how her father, Allan Pal, influenced her education.She grew up in San Jose, California, and will graduate in 2014 with a degree in web design and computer engineering. This summer she is building a solar-powered home "Radiant House" for the Department of Energy’s Solar Decathlon competition.

**By Nicole Pal)**

Forget barbies or tea cups. The most precious gifts I received as a child were a white board and a book about bridges. I never questioned whether I could succeed as an engineer, and as I head into my final year of engineering school at Santa Clara University, I realize my dad played a huge role.

I’ve always been a daddy’s girl and some of my fondest childhood memories are huddled over that giant white board with my dad. To this day, the board still dominates my bedroom wall. More important than the board itself was how my father helped me process the world around me.

While some young girls might give up on a math question if they didn’t know the answer, my father was patient enough to walk through a problem *with* me- not just walk me through it. He let me re-work problems until the dry-erase marker was whittled to a stub. I was never tempted to smile, nod and simply pretend I understood. I always keep the whiteboard in mind when tutoring younger girls in algebra.

My father, who is an engineer with a microprocessing company, encouraged me to be hands on in whatever project he was working on. I remember learning how to use a saw and gleefully shouting "timber" as 2x4s hit the floor. I’ve helped install solar panels at our home. When I was 10 and too young to safely maneuver the roof, I was in charge of tossing water bottles up to my dad and his friends. I knew how to swing a hammer, saw wood, and measure square footage by the time I was in middle school.

I’m passionate about engineering now because it helps me make sense of the world. By letting me problem-solve and get hands on with projects as a young child, I’ve learned how to make the world compute.

One of the biggest ways my father nurtured my advancement in engineering was helping me find my passion and encouraging me to put in the hard work. I adored a big book of bridges as a child. My parents taught me to see not only the beauty in the structure, but that certain spans can only carry so much weight. I started to see the world in engineering terms from a young age.

Today, I’m the assistant team manager for Santa Clara University’s Solar Decathlon team and leading the construction of a solar house on campus this summer.

Though my dad knew his way around a garage and drawings as an engineer, he also cooked, cleaned and picked me up from school while respecting my mother’s career pursuits. I wasn’t aware of the notion that those were "women’s duties" until much later in life. It never phased me that both of my parents worked or that my father was the only dad on my first cheer trip to nationals.

My parents’ relationship is a true partnership and knowing that keeps me from settling for anything less. The idea that I shouldn’t go after my dreams because I’m a girl or I might intimidate a love interest never crossed my mind.

My father taught me never to take myself too seriously. He is never afraid to make a fool of himself. When I was a teenager, he decided we should learn to wakeboard. He bought the most ridiculous, bright, teenage-daughter-mortifying orange board shorts, claiming they’d help us find him if he fell in. He taught me not to care about what others think but instead to enjoy life.

These experiences help in class. I’m never afraid to raise my hand or disagree with an answer merely because I don’t want to look stupid.

I hope more parents encourage young girls to pursue careers in STEM by encouraging them to think for themselves, to never get intimidated by the world and challenge them to think for themselves. And they can help them to develop a passion for math and science, while always taking time to laugh a little, either at yourself or your dad.

Happy Father’s Day to all the dads raising the next generation of engineering women!

✳

## पत्र प्रतिक्रिया

प्रभुतरुणचा जूनचा अंक मिळाला. ‘वुई आर ऑन’ हे संपादकीय खूपच भावले. जुन्या आठवणींना उजाळा दिलात. १९५०-६० ह्या दशकात विषय निवडण्याची मुभा नव्हती. फक्त सेकंड लँग्वेज निवडण्याची मुभा होती. त्यावेळी विद्यार्थ्यांची आकलनशक्ती वाढविणे हा मुख्य हेतू होता. ह्या गोष्टीचा विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यात फायदा होत असे.

सद्य शिक्षणपद्धतीत विद्यार्थी आपले विषय निवडतो व आपले प्रभुत्व दाखवितो. शिक्षणाचा प्रसार वाढल्यामुळे, आजच्या युवा पिढीला मोठ्या चढाओढीला सामोरे जावे लागते. बरेच विद्यार्थी आपले ध्येय पूर्ण करण्यासाठी आपल्या आई/ वडीलांना सोडून परप्रांतात शिक्षणासाठी जातात. युवापिढीची ही धडाडी पाहिली तर-

`Hats off to Them'

**-सौ. ज्योत्स्ना रंजन धैर्यवान**

पुणे

मो. ९७३०७९०२२२

✳

## पत्र प्रतिक्रिया

## SSC Results

Your editorial of last month with vivid description of the anticipation, expectation and celebrations associated with SSC results, took me back to 1951. That year I had appeared for SSc and the results were to be announced in the second or third week of May.

At that time SSC results were sent on previous day to all presses in Mumbai by the SSC board. Every student would try to get his result on the previous day. Similarly, I was keen to get my result from the press on Goregaonkar Lane in Girgaum. At about 4.00 pm the results would come to the press and in order to prevent confusion the press would close its main iron doors. All of us would wait outside with our name and seat number on a chit of paper and pass it on to a press worker who would be like a messenger of God for us. The chit would come back with pass/fail and marks obtained. When I opened my chit with a thumping in my heart, I was exceedingly happy to see that I had passsed with distinction.

But seeing is believing, so I had to wait till next morning to see for myself the result in newspaper. I must have got up at 4.00 a.m. `Maratha' the newspaper of Mr. Atre was the first to appear. I grabbed the paper and scanned for my number. At that time the paper would print the passed seat number along with marks scored. I confirmed what I had seen the previous day.

There were few telephones then and freinds would drop at each other's house to see how one had fared. My father ordered pedhas from Futane-bai and distributed them to our relatives. After about a week college admission were to be started. Coming from an English speaking Convent School, it would have been sacrilege to think of any other college than St. Xaviers College. My eldest sister the late Mrs Sulabha K. Kirtikar took me to the college, filled a form, paid the fees for the science stream and DONE. That was all that was reuired at that time to get admission..

As my sister was an ex-student of the college, she took me around to meet some professors. Prof. A. N. Kothare was the professor of inorganic chemistry, when he saw me with my sister, he remarked, ``Ah! So you have come to use your influence to get your brother admitted," the reply rhat my sisiter gave made my collar tight- ``Of cours not, he comes on his own merit". The celebration ended with traditional home made pot mango ice-cream.

I had to wait till our Prabhu Tarun published printed the passed list with marks to know where I stood in our community. I was piped to the first rank by a girl who had scored five marks more than me. I also remember how I had received a grand prize of Rs. 15/- for standing second and scoring highest in maths & science (now I compare it with my grandson who two years ago got Rs. 7500/-)

Those were the days when life was uncomplicated.

**-VINOD PRADHAN**

Malad

✳

## प्रतिभेचे नाचले मयुर...

धुवांधार पर्जन्य बरसला
अवचित का मन्मनी
प्रतिभेचे नाचले मयुर ही
मखमल उलगडुनी।।धृ।।

मिटल्या होत्या मनपाकळ्या
पर्णकोषी दडुनी
लपली होती शीळ वायुची
वेळुच्या रानी
धरतीच्या सादेला दिधला
हा हुंकार कुणी?।।१।।

सुकल्या होत्या आशावेली
ओलाव्या वाचुनी
भावतरुंच्या ह्रदयावरती
माना टेकवुनी
राघुंचे का थवे उतरले
आज मोहरुनी?।।२।।

मयुरीच्या त्या केकावलीने
मन कासावीस झाले
पानामागुनी आर्ततेने
चातक चित्कारले
शांत माझे मनसरोवर
भरले लहरींनी।।३।।

**-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर**

लेखांक ६

# मनातलं

-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर

जुलै महिन्यात सर्वसाधारणतः नियमित पावसाळा सुरू झालेला असतो. हवेत गारवा असतो. खिडकीच्या काचेतून बाहेर बघितलं तर सगळीकडे पाणीच दिसतं. केबलवरून सरकणारे पाण्याचे थेंब, खिडकीवरच्या छपरावरून टिपटिप गळणारं पाणी, नुकतीच धुवांधार पावसानं चिंबओली झालेली झाडं, फांद्या जोराच्या वाऱ्यानं हलल्यामुळे पानांवरच्या जलमोत्यांचा होणारा वर्षाव, जमिनीवर फूटपाथच्या कडेनं वाहणारं पाणी क्वचित्प्रसंगी सगळीकडे गुडघ्यापर्यंत किंवा कमरेपर्यंत साठलेलं नि म्हणून विस्तीर्ण जलाशयाचा आभास निर्माण करणारं, हेच बघायला मिळतं. पण त्याबरोबरच झाडांचा खुललेला रंग मनाला मोहवून टाकतो. त्या हिरव्या रंगाच्या छटा तरी किती? देवाचं हे निसर्गचित्र बहारदारच दिसतं. अशा वातावरणात 'आषाढस्य प्रथम दिवसे...'नं सुरुवात झालेलं 'मेघदूत'हे महाकाव्य कालिदासासारख्या प्रतिभावान कवीला सुचलं नसतं तरच नवल. प्राणीमात्रांना संजीवन देणारा हा पाऊस एरव्ही जीवनदायी ठरतो; पण लहर फिरली तर बघता बघता सचेतनांचं अचेतन करण्याची प्रलयकारी शक्ती त्याच्यात असते. हे दैव आणि पडणाऱ्या पावसाचं सुनियोजन करणं हा माणसाचा प्रयत्न.

लहानपणापासून शाळेत, कॉलेजमध्ये, वक्तृत्वस्पर्धांमध्ये 'दैववाद की प्रयत्नवाद' हा विषय असायचाच. त्यावेळी आईवडील नि गुरुजन ह्यांच्या मदतीनं एक कोणतीतरी बाजू हिरीरीने मांडली जायची. जिंकणारा मग पुढे मोठे होईपर्यंत त्याच बाजूला प्रमाण समजायचा. मोठं झाल्यावर मात्र लक्षात येतं की, लहानपणी जिंकून देणारी कोणतीही बाजू नेहमीच श्रेष्ठ असते असं नाही. एक बाजू बरोबर म्हणून वाटचाल करावी तर; दुसरी बाजू आडवी येते. दुसरी बाजू श्रेष्ठ धरली तर; पहिली बाजू कमकुवत का ठेवली म्हणून खंत वाटते. खूप अभ्यास करून परीक्षेत पहिलं येणं हे प्रयत्नाचं सुंदर उदाहरण. पण तोच विद्यार्थी ऐनवेळी आजारी पडणं नी परीक्षा देऊ न शकणं किंवा परीक्षेच्या हॉलमध्ये जाऊनही अतिअभ्यासानं ऐनवेळी मेंदू सुन्न होणं नी काहीच न आठवणं हा प्रयत्नवादाचा अतिरेक की दैवाचा भीमटोला? एखादा कॉपीबहाद्दर खूप वेळा कॉपी करूनही सहीसलामत सुटतो; तर कधीकधी पहिल्याच वेळी पकडला जाऊन तीनतीन वर्षे शिक्षणाला नि परीक्षेला मुकतो. कधी एखाद्या हुषार विद्यार्थ्याचा पेपर तपासताना परीक्षकाचा मूड खराब असला तर कमी मार्क्स मिळतात अन् एखादा सुमार दर्जाचा पेपर लिहूनसुद्धा परीक्षकांच्या अप्रतिम मूडमुळे परीक्षा पास होऊन जातो. हे सगळं घडताना बघितल्यावर आपली बुद्धी चक्रावते.

'महापुरे झाडे जाती तेथे लव्हाळे वाचती' या उक्तीप्रमाणे मोठे डेरेदार वृक्ष सहज उन्मळून पडतात,पण छोटी रोपे मात्र आश्चर्यकारकरित्या वाचतात अन् नंतर जगतातसुद्धा. तुफानातून , प्रलयातून वाचणारे जीव पाहिले की दैवावरचा विश्वास कायम होतो.

मुंबईतला २६ जुलै २००५चा पाऊस आणि तेव्हा झालेला प्रलय तर कुणीच विसरणार नाही. माझ्या आठवणीप्रमाणे ५ जून, १९७४चा पाऊसही भयानक होता. तेव्हा पाच तासात सोळा इंच पाऊस पडला होता. मी आणि माझे पती बाबुलनाथच्या हॉस्पिटलमधून आईजवळ थोडा वेळ बसून संध्याकाळी साडेसातला निघालो आणि रस्ते पाण्यानं भरले होते. त्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी नऊसाडेनऊला दादरला घरी पोहोचलो. रात्रभर आम्ही टॅक्सीतच होतो. हे दैव. तरी तेव्हा डांबरी रस्ते होते म्हणून पाण्याचा बऱ्याच प्रमाणात निचरा होत असे. २००५ मध्ये बरेच रस्ते सिमेंट-कॉंक्रीटचे झाले होते. रस्ते असे करण्यात माणसाचा हेतू चांगला होता. पण हे प्रयत्न पूरसदृश्य परिस्थितीला अत्यंत पोषक ठरले. अर्थात पाऊसही खूप पडला होता. मग इथं प्रयत्न आणि दैव यांचं प्रमाण किती होतं ही विचार करण्यासारखी बाब आहे. निसर्ग जेवढा सुंदर आणि शांत तेवढाच भयाण आणि रौद्रस्वरूप धारण करतो. कधीकधी भयाण वणव्यात किंवा प्रलयात काही जणांचं सर्वस्व नष्ट होतं तर; काहीजणांच्या जीवावर बेतलेलं अक्षरशः नखावर निभावतं. माणसाच्या प्रयत्नांनी निसर्गाला काबीज करण्याचं ठरवलं, पण अशा अस्मानी संकटाच्यावेळी प्रश्न पडतो की माणसाचे प्रयत्न थिटे की दैव मोठे?

असं जर आहे तर माणसानं बुद्धीची टिमकी किती वाजवायची? तिथे मग प्रयत्न थिटे की दैव मोठे? दैवावर मात करताना काय म्हणायचं- दैव थिटे नी प्रयत्न मोठे? की एखाद्याच्या नशिबातच चांगलं म्हणून प्रयत्न फलद्रूप? आणि एखाद्याचं नशीबच वाईट म्हणून कितीही प्रयत्न केले तरी प्रयत्नांना यश नाही असं म्हणायचं? दैव बलवत्तर म्हणून एखादा वाचला अशी स्थिती असतांनाही क्वचित तो 'स्वतःच्याच हुषारीमुळे वाचला' असा डांगोरा पिटत फिरतो. मोठेमोठे डॉक्टरसुद्धा दैवावर हवाला ठेवताना दिसतात. तिथं त्यांचं ज्ञान तोकडं नसतं. प्रयत्न तर मुळीसुद्धा कमी नसतात. तरीही रुग्ण दगावतो. कधी अशा डॉक्टरांना त्या रुग्णाच्या नातेवाईकांच्या पराकोटीच्या रागाचं शिकार होणं भाग पडतं. पण तो रुग्ण अत्यवस्थ स्थितीतच त्या डॉक्टरांकडे उपचारासाठी पोहोचलेला असतो, हे सत्य त्या नातेवाईकांना रुचत नाहीच; पण पचतही नाही. आणि मग त्या डॉक्टरांची, त्या हॉस्पिटलची दुर्दशा होते. हे कोणाचे दैव? मरणं हे त्या रुग्णाचं दैव की त्याला वाचविण्याची पराकाष्ठा करूनही अपयश पदरी पडलेल्या डॉक्टरांचं? की तिथे असलेल्या रुग्णाच्या नातेवाईकांचं, जे त्यांच्या रागाच्या अतिरेकामुळे घडतं? हे टाळणं बरंच माणसाच्या हाती असतं? की जेव्हा असं काही घडत नाही, नातेवाईक समजूतदारपणे त्यांच्या वाट्याला आलेलं दुःख स्वीकारतात तेव्हा डॉक्टरांचं दैव चांगलं असतं? आणि रुग्ण जेव्हा वाचतो तेव्हा डॉक्टरांचं दैव चांगलं की त्यांचे प्रयत्न चांगले?

एक मात्र खरं की जे दुःख पचवू शकतच नाहीत ते त्यांच्या कोणत्याही दुःखाचं खापर दुसऱ्यावरच फोडतात. अर्थात कधीच डॉक्टरांची किंवा हॉस्पिटलची चूक नसते असं मात्र मुळीच नाही. पण तसं नसतानाही असे लोक क्वचित प्रसंगी दुसऱ्यावर आलेल्या एखाद्या संकटाच्यावेळी परिस्थितीची शहानिशा न करताच 'मुळूमुळू रडत काय बसता? केस करा डॉक्टरवर. ह्या लोकांना असाच धडा शिकवायला हवा.' असा बेधडक सल्ला न मागताच दुःखी लोकांना देतात, तेव्हा त्या दुःखी माणसांचा मेंदू 'हा बोलतोय ते खरंच आहे. आपलंच चुकलं का?' अशा चुकीच्या विचारभुंग्यानं पोखरला जातो. पण हा चुकीचा सल्ला देणाऱ्यांना मात्र 'आम्ही सर्वच बाबतीत विजय आमच्याकडे खेचून आणतो' हा सल्ल्याहूनसुद्धा अत्यंत चुकीचा अहंकार वेटोळं घालून बसलेला असतो. त्यातूनच कधीकधी 'रुग्णाला तुम्ही कसं चुकीच्या डॉक्टरकडे नेलंत? त्याऐवजी अमुकतमुक डॉक्टरकडे नेलं असतंत तर आज तो (किंवा ती) वाचला असता', असं बोलून त्या दुःखी लोकांना अधिकच दुःखी करतात.

असाच दुराभिमान शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या काही उद्योजकांना वाटत असतो. अर्थात सगळेच उद्योजक तसे नसतात हे लक्षात घ्यायला हवं. ते उद्योजक मनापासून उद्योग भरभराटीला आणण्याचा प्रयत्न करतात नी कालांतरानं यशस्वी होतात. पण काहींना स्वतःला उद्योगात स्थिर करायलाच वेळ लागतो. ते मग स्वतःच्याच कर्तृत्वाचा बडेजाव उगीचच सगळीकडे करताना दिसतात. नी 'दैव आमच्या मुठीत आहे. आम्ही दैवाला नमविलं. सुदैवाला आमच्याकडे वळविलं' अशी दर्पोक्तीसुद्धा वारंवार करतात. ते चुकीचं वाटतं.

अर्थात नुसता प्रयत्नवाद मोठा नसतो, तसाच नुसता दैववादसुद्धा प्रबळ नसतो. दैववाद आणि प्रयत्नवाद ह्या दोघांच्या समन्वयामधूनच सुयश हे उत्तर येतं. दैववाद आणि प्रयत्नवाद हे दोन्ही हातात हात घालूनच असतात. फक्त दैव चांगलं म्हणून जर कोणी अभ्यासाविनाच परीक्षेला बसलं तर नापासच होणार. तसंच जमेपेक्षा खर्च भरमसाठ केला तर 'दैव देते अन् कर्म नेते' असंच चित्र दिसणार. शेअर मार्केटमधला सट्टा भल्याभल्यांना आयुष्यातून उठवतो. तेव्हा त्यांचा शेअरमार्केटचा अभ्यास नी पैसे वाढवण्याचा प्रयत्न दोन्ही चक्क नेस्तनाबूत होतात. तीच गोष्ट घोड्याच्या शर्यतीची. स्वतःवर जरुरीपेक्षा जास्त आत्मविश्वास असणाऱ्यांची गत चुकीच्या शेवटास जाते. दारू पिणाऱ्या माणसाचं तेच होतं. अर्थात सर्वच दारू पिणाऱ्यांचं असं होतं असं नाही. पण काहीजण 'आम्ही प्रमाणात पितो. आम्ही पितो म्हणजे काय गटारात लोळतो का?' असं म्हणून स्वतःच्या दारू पिण्याचं समर्थन करणारे भले भले दारू पिऊन झिंगून पार्ट्यांमध्ये सगळा ताळतंत्र सोडतात. त्यात बायकासुद्धा मागे नसतात. तेव्हा त्यांची दारू उतरल्यानंतर त्यांना विचारावंसं वाटतं की 'कुठे गेलं तुमचं प्रमाण?' पण जेव्हा हे लोक शुद्धीवर येतात तेव्हा दारुच्या नशेत त्यांनी काय केलंय हे त्यांना आठवत नसतं आणि शुद्धीवर असतात तेव्हा त्यांची प्रमाणात पिण्याची रेकॉर्ड सतत वाजत राहते.

स्वतःच्या चुकीच्या गोष्टीचं समर्थन करणं तसं चूक, तसंच एखादीचा नवरा दारू पितो ह्या गोष्टीचं खापर 'त्याची बायको त्याच्याशी बरी वागत नाही म्हणून तो बाहेर जाऊन दारू प्यायला लागला किंवा त्याच्या मित्रांमुळे त्याला दारुचं व्यसन लागलं' असं म्हणत त्या माणसाची बाजू घेणं चूकच. इथं ना दैव मदतीला येतं, ना त्याचं व्यसन सोडविण्याचे त्याच्या घरच्यानी केलेले प्रयत्न कामी येतात. उलट नवऱ्याला साथ देण्यासाठी बायको दारू पिऊ लागली हेच चित्र तथाकथित पुढारलेल्या समाजात दिसून येतं, ते कुणाचं कर्म किंवा प्रयत्न? की दैवाचा भाग?

(पान ६ कॉलम ४ वर)

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

## प्रभुतरुणास देणगी

❁ सौ. अनुश्री रंजन देसाई आणि डॉ. रंजन मुकुंद देसाई यांजकडून त्यांचे सुपुत्र श्री. अन्वय यांच्या विवाहाप्रीत्यर्थ आणि त्यांचा नातू चि. कुश साहिल देसाई याच्या व्रतबंधनाप्रीत्यर्थ रु. २००२/-

❁ श्री. स्वप्नील सुरेश नवलकर यांजकडून प्रभुतरुणाचे आजीव सदस्यत्व रु. ३५०/-

❁ सौ. शीतल आणि श्री. स्वप्नील सुरेश नवलकर यांजकडून त्यांची सुकन्या कुमारी सुरभी दहावीच्या परीक्षेत ९० टक्क्यांनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्याप्रीत्यर्थ रु. १००१/-

❁ सौ. अनुराधा आणि श्री. अरविंद धराधर यांच्या विवाह सुवर्ण महोत्सवानिमित्त रु. २५१/-

## अभिनंदन

❁ पुणे येथून प्रकाशित होणाऱ्या ‘जय सिंहगड’ साप्ताहिकात वास्तुशास्त्रज्ञ उज्ज्वला गोविंदराव आगासकर यांचे ‘सदर’ सादर होत आहे. अभिनंदन.

❁ दिल्लीस्थित एक अभ्यासक श्री. विजय उपाध्ये म्हणून आहेत. ते वेदकालीन संस्कृती, विज्ञान, कला यांचा अभ्यास करीत आहेत. स्वामी महर्षी दयानंद सरस्वतींच्या वाङ्मयाचा आणि कार्याचा या संदर्भात मागोवा घेताना त्यांना विमानोड्डाणाच्या तंत्रज्ञानाविषयी सांगणारे काही श्लोक सापडले. त्या अनुषंगाने अधिक तपास करताना शिवकर बापूजी तळपदे यांच्या पाऱ्याच्या सहाय्याने विमान तयार करून उडविण्याच्या प्रयोगाची त्यांना माहिती मिळाली. त्यावर त्यांचे संशोधन सध्या चालू आहे. एका ज्ञातीयाच्या महान प्रयोगाची दखल दिल्लीचे अभ्यासक घेत आहेत. त्यांच्या कार्याला शुभेच्छा.

## परीक्षेतील सुयश

**एलएलबी** (नॅशनल लॉ युनियन, गुजरात)
कु. श्रृती सुकृत विजयकर, प्रथम वर्ग

**बी. कॉम.** (मुंबई विद्यापीठ)
कु. देवश्री नीलेश भालचंद्र कोठारे ८५%
श्री. मयुरेश दिलीप वाचकर, ८२%
श्री. साकेत नितांत त्रिलोकेकर, ८०.७१%
कु. शलाका नीलेश विजयकर, ७२%

**एसएससी**
श्री. सिद्धेश राजीव तळपदे, ८९.२७%
श्री. निमिष नीलेश विजयकर, ७६%
श्री. वरुण अजय कोठारे, ६३.०९%

**एच्एस्सी, कॉमर्स**
कु. भाग्यश्री सागर अजिंक्य, ७३.६७%
कु. भक्ती अभय मानकर, ७०%

**एच्एस्सी, सायन्स**
श्री. प्रतिक प्रकाश विजयकर, ९०.१७%

**पूर्व माध्यमिक शाळा**
**शिष्यवृत्ती परीक्षा** (MSS)
श्रिया कौशिक जयकर, गुण २०६/३००
पार्थ इंद्रजित कीर्तिकर, गुण १७२/३००

**आयसीएससी (दहावी)**
कु. सुरभी स्वप्नील नवलकर, ९०%, ए ग्रेड

## श्रद्धांजली

श्री. मधुकर धुंडिराज कोठारे हे तबलापटू होते. सौ. शीला आणि श्री. मधुकर यांचे आतिथ्य सर्व मराठी कलाकारांना लाभले आहे. लंडनमधील महाराष्ट्र मंडळाचा मधुकर आधार होते. मोठमोठ्या कलाकारांना त्यांची साथ सुखवून जाई. त्यांच्या निधनाने आपल्या ज्ञातीने एक कलाकार गमावला आहे. त्यांना विनम्र भावांजली.

## प्रभुतरुणाची डायरी

### बाळा जो जो रे

०८-६-१३ सौ. चैताली आणि श्री. संकेत रंजनलाल धुरंधर, पुत्र, बोरीवली

### कुर्यात् बटोर्मंगलम्

२२-०५-१३ युग परेश तेजपाल कोठारे

### विवाह सुवर्णमहोत्सव

२६-०४-१३ सौ. अनुराधा आणि श्री. अरविंद धराधर

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १०-५-१३ | श्रीमती विजया रामराव झावबा | वय ८० | ठाणे |
| ०५-०६-१३ | श्री. चंद्रकुमार चंद्रकांत नायक | वय ७१ | ठाकुरद्वार |
| २२-०६-१३ | श्रीमती शीला बाळाराम कीर्तिकर | वय ८७ | दादर (प.) |
| २६-६-१३ | श्री. दीपक विश्वनाथ राव | वय ६७ | ठाणे |
| ३०-०६-१३ | श्री. मधुकर धुंडिराज कोठारे | वय ७९ | लंडन |

(पान ५ कॉलम ४ वरून)

जगाच्या अंतापर्यंत ह्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यातच प्रत्येकाचा वेळ जाईल. तरीही , आपल्या आयुष्याचा जमाखर्च नि:पक्षपातीपणे नी त्रयस्थ दृष्टीकोनातून करणं हे आपल्या हाती निश्चितच असतं. रोजच्या दगदगीच्या आयुष्यात कदाचित् हे जमणार नाही. किंवा आयुष्याच्या धावपळीत एवढा त्रयस्थपणाही शक्य होणार नाही. मे महिन्यात रजा घेऊनही तेव्हा मे महिना कुटुंबीयांबरोबर आनंदात घालवताना हा विचारही नकोसा वाटेल.

त्यासाठी ओलाचिंब, घरात काही न करता नुसतं बसून खिडकीबाहेर बघता बघता घटकाभर विचार करायला वेळ देणारा हा जुलै महिनाच चांगला.


**MAHABALESHWAR**

*COME HERE TO EXPERIENCE NATURE AT ITS BEST WITH*
*JASMINE COTTAGE*




*THE COTTAGE OFFERS 4 SPACIOUS ROOMS . IT PROVIDES ACCOMODATION FACILITIES TO SUIT THE BUDGET OF THE TOURIST ALL THE ROOMS HAVE SERENE ENVIRONMENT AND OPEN SIT-OUT VARANDA WHERE GUESTS CAN SIT AND ENJOY THE PLEASANT BEAUTY OF THE NATURE*

**FACILITIES:**
* Attached bath
* Hot & Cold Running water
* Television with Satellite Connection
* Car Parking
* Large open area for playing outdoor games

**Location:**
It is located near the market in Mahabaleshwar within close proximity of bus stand in the gorgeous land of Mahabaleshwar.

***For Booking Contact:***
***Velkars 9930172689 9220451465***


हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67